N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** चिखली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0206 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**15/03/2024 01:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 14/03/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/03/2024

**Time From (वेळेपासून):** 15:29 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/03/2024 **Time (वेळ):** 01:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/03/2024 01:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती चिखली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** समाधान कारभारी केदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गुंजाळा, पो मेरा बु ताचिखली,अंढेरा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गुंजाळा, पो मेरा बु ताचिखली,अंढेरा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9307679430

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र हिम्मतराव भंडारे | | | 1. संतोषी मातेच्या मंदीराजवळ, गांधीनगर, चिखली,चिखली, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/Informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 12नोटा | 6,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
लाप्रवि बुलढाणा
कॅम्पः शासकीय विश्रामगृह चिखली
दिनांक 15.03.2024

श्री. समाधान कारभारी केदार, वय ५४ वर्ष, व्यवसाय शेती, रा. गुंजाळा, पो. मेरा बु. ता.चिखली, जि. बुलढाणा
मो. क्र. 9307679430

समक्ष हजर येवुन टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरिलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी कुटुंबासह राहतो व शेतीचा व्यवसाय करतो. मी दिनांक 14.03.2024 रोजी एका लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी करीत असल्याची तकार असल्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरोकडे केली होती. त्यानुसार मला पोलीस निरीक्षक श्री महेश भोसले, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी फोनवर संपर्क करुन चिखली ते बुलढाणा रोडवरील सवणा फाटा येथे थांबून राहण्याबाबत सुचीत केले.
त्यानुसार मी सवणा फाटा चिखली येथे हजर असतांना पोलीस निरीक्षक श्री. महेश भोसले हे एका वाहनाने कारवाई पथकासह हजर आले. तेव्हा पोलीस निरीक्षक महेश भोसले यांनी स्वतःचा तसेच सापळा पथकातील इतर कर्मचारी तसेच पंचांचा परीचय करून दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महेश भोसले यांच्याकडे मी माझी लेखी तकार दिली की, समाज कल्याण विभाग अंतर्गत 20 टक्के/सेसफंड योजनेअंतर्गत सन 2023-24 या गट वर्षात मागासवर्गीय शेतकरी / महीला लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर थेट लाभ हस्तांतरण योजनेअंतर्गत विद्युत मोटार पंप/शिलाई मशीन/स्प्रिंकलर पाईप इत्यादीचा लाभ मिळत असल्याने मी सन 2023 चे अखेरीस माझे व पत्नीचे नावाने इलेक्ट्रीक पंप व मुलगा प्रफुलच्या नावाने एचडीपीई स्प्रिंकलर पाईप व मुलगी दिपाली हिचे नावाने शिलाई मशीन इत्यादीचा लाभ मिळण्याकरीता पंचायत समीती चिखली येथे रितसर सर्व कागदपत्रे जोडुन अर्ज सादर केला होता. त्या संदर्भात मी अंदाजे 15 दिवसापुर्वी पंचायत समीती चिखली येथील संबधीत श्री. भंडारे, लिपीक यांची भेट घेतली असता त्यांनी माझे व माझे पत्नीचे नावे इलेक्ट्रीक पंप व मुलगा प्रफुलच्या नावाने एचडीपीई स्प्रिंकलर पाईप व मुलगी दिपाली हिचे नावाने शिलाई मशीन इत्यादी लाभ मिळण्याकरीता समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद बुलढाणा येथे पाठविलेल्या प्रस्तावाचा मोबदला तसेच सदर योजनेअंतर्गत अनुदान मिळवुन देण्याकरीता 12000/- रुपये लाचेची मागणी केली व त्याच दिवशी त्यांनी माझ्याकडुन 1000/- रुपये स्विकालेले असुन उर्वरीत 11000/- रुपये लाच रक्कम आज रोजी स्विकारणार असल्याबाबत लेखी तकार नोंद केली.
त्यानतर पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेब यांनी माझी लेखी तकार हि पंचाना वाचावयास दिली व त्यानंतर माझेकडुन तोंडी कथन करून घेतली त्यातील मजकुर बरोबरच असल्याने पंच क्र.1 श्री. विठ्ठल काळे यांनी त्यावर त्यांचे स्वहस्ताक्षरात शेरा मारुन दोन्ही पंचानी त्यावर सहया केल्या आहेत. त्यानंतर श्री भोसले साहेब यांनी मला शासकिय वाहनात बसवून घेवून दोन्ही पंचाना तसेच मला पडताळणी पुर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवुन सोबत आणलेल्या व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहीती दिली त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे.
पडताळणी पुर्व पंचनामा कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर मी दिलेल्या तकारीनुसार यातील लोकसेवक श्री.भंडारे, लिपीक, पंचायत समीती चिखली यांची लाच मागणी आहे किंवा कसे याबाबत लाच मागणी पडताळणी कार्यवाही करणे असल्याने पोलीस निरीक्षक श्री भोसले साहेब यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन मला व पंच क्र.1 श्री विठ्ठल काळे यांना मी सोबत आणलेल्या माझ्या मोटार सायकलने पंचायत समीती कार्यालय चिखली येथे 14.23 वा. रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र.1 श्री काळे असे पंचायत समीती कार्यालय चिखली येथे गेलो त्यावेळी सदर

ठिकाणी श्री. भंडारे लिपीक हजर नव्हते तेव्हा मी माझे मोबाईलवरुन त्यांना फोन लावुन ऑफीसला आलो असल्याचे सांगीतले. त्यावर त्यांनी इकडं मठात यानं, मौनी बाबाच्या मठात असे म्हणुन मला चिखली शहरातील मौनी बाबा संस्थान येथे बोलवले. त्यावरुन मी व पंच क्र.1 श्री. काळे असे माझे मोटार सायकलने मौनी बाबा संस्थान येथे गेलो, सदर ठिकाणी लिपीक श्री. भंडारे यांची भेट घेतली असता लोकसेवक श्री भंडारे यांनी मला आमचे वर नमुद काम करुन देण्यासाठी पंचासमक्ष मला पुन्हा 12000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 11000/- रुपये स्विकारण्यास समंती देवून लाचेच्या रक्कमेतील पहिला हप्ता 6000/- रुपये आज रोजी पंचायत समिती कार्यालय चिखली येथे घेवून येण्यास सांगीतल्याने आम्ही कार्यवाही पथकाजवळ परत आलो.
त्यावेळी पंच क्र.1 श्री. काळे व मी घडलेली हकिकत पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेब तसेच पंच क्र.2 श्री दंडेकर व सापळा पथकास सांगीतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेब व सापळा पथकाने व्हॉईस रेकॉर्डर मध्ये माझे व लोकसेवक लिपीक श्री. भंडारे यांचे रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून लोकसेवक लिपीक श्री.भंडारे यांनी मला तडजोडीअंती 11000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेचा पहीला हप्ता 6000/- रुपये पंचायत समीती चिखली येथे त्यांचे कार्यालयात स्विकारणार असल्याची खात्री झाल्याने सदर प्रकरणात आजच सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री.भोसले साहेब यांनी सवणा फाटा चिखली येथे शासकीय वाहनात माझेकडून लोकसेवक श्री.भंडारे, लिपिक, पंचायत समीती चिखली यांना लाच म्हणून देण्यासाठी 6000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील भारतीय चलनाच्या पाचशे रुपये दराच्या 12 नोटा असे एकुण 6000/- रुपये पोलीस निरीक्षक श्री.भोसले साहेब यांचेकडे हजर केले. त्यांनी सापळा पथकातील सदस्यांचे मदतीने सदर नोटाचे क्रमांक लिहुन घेतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.भोसले साहेब यांनी मला व पंचांना अॅन्थ्रासीन पावडर चे गुणधर्म व अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पबाबत माहीती दिली शासकीय वाहनातच सदर नोटाना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रकीया पुर्ण करुन, मला तसेच पंच क्र.1 श्री. विठ्ठल काळे यांना सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेब यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील एका सदस्याने लाचेची रक्कम माझे शर्टाचे वरील डाव्या बाजुचे खिशात खोलवर ठेवून दिली.
त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेब यांनी मला सापळा कार्यवाही संबंधाने आवश्यक त्या सुचना देवून माझेकडे पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन मला व पंच क्र.1 श्री. विठ्ठल काळे यांना माझे मोटार सायकलने पंचायत समीती कार्यालय चिखली येथे 15.29 वा. रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री भोसले साहेब तसेच सापळा पथक, व पंच क्र.2 श्री.दंडेकर असे शासकीय वाहनाने माझे व पंच क्र.1 यांचे मागोमाग पंचायत समीती कार्यालय चिखली जवळ येवुन न्यायालयासमोर वाहन उभे करुन वाहनातुन उतरुन पायी चालत पंचायत समीती चिखली कडे जाणाऱ्या रस्त्याने आमच्या मागे चालत येवुन पंचायत समीती चिखलीचे आवारात आले, तेव्हा मी व पंच क्र.1 श्री. काळे असे पंचायत समीती चिखली आवारात चालत गेलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेब सोबत पंच क्र.2 व सापळा पथक असे आमचे मागोमाग आले. पंचायत समीती चिखली कार्यालयाचे आवारात पश्चिम दिशेला असलेल्या इमारतीमध्ये समाज कल्याण विभाग लिहीलेल्या इमारत मधील उजव्या बाजुचे खोलीमध्ये श्री.भंडारे, लिपीक बसतात त्या खोलीचे आजुबाजुने पोलीस निरीक्षक श्री.भोसले साहेब सोबत पंच क्र.2 व सापळा पथक असे आपापले अस्तीत्व लपवुन थांबुन राहीले. अशा प्रकारे रितसर सापळा आयोजीत केला.
त्यानंतर मी सोबत पंच क्र.1 श्री.काळे असे सदर खोलीमध्ये जावुन लिपीक श्री.भंडारे यांची भेट घेतली, त्यांचेशी इलेक्ट्रीक पंप, स्प्रिंकलर पाईप व शिलाई मशीन
. साहीत्याचे अनुदानासंबधाने बोलणी झाली. सदर बोलणी दरम्यान मी, श्री.भंडारे लिपीक यांना म्हणालो की, म्या साइकडुन सहा हजार रुपये घेतले आता. त्यावर श्री भंडारे लिपीक म्हणाले की, तुम्ही घडी घडी तेच काय बोलता, चर्चा झाली न आपली. तेव्हा मी माझे शर्टाचे खिशातील लाचेची रक्कम 6000/- रुपये उजव्या हाताने काढुन श्री भंडारे यांचे समोर धरुन हे सहा हजार रुपये असे म्हणालो असता श्री भंडारे यांनी हं म्हणुन सदर लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन टेबलावर ठेवली. त्यानंतर मी त्यांना माझे कुटुंबियांचे नाव घेवुन फक्त क्लिअर करा, असे म्हटले. त्यावर श्री.भंडारे लिपीक म्हणाले की, हं म्हणुन होकार दिला. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन डोक्याला गुंडाळलेला रुमाल सोडुन हातात धरुन लाच स्विकारल्याबा नियोजीत इशारा केला असता त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. भोसले साहेब, पंच कर व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक लिपीक श्री भंडारे यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.रविंद्र हिम्मतराव भंडारे, वय 54 वर्षे, पद कनिष्ठ सहायक, समाज कल्याण विभाग, पंचायत समीती चिखली, रा. संतोषी मातेच्या मंदीराजवळ, गांधीनगर, चिखली, ता. चिखली जि. बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी श्री रविंद्र हिम्मतराव भंडारे, वय 54 वर्षे, पद कनिष्ठ सहायक, समाज कल्याण विभाग, पंचायत समीती चिखली, रा. संतोषी मातेच्या मंदीराजवळ, गांधीनगर, चिखली, ता. चिखली जि बुलढाणा यांनी दिनांक 14.03.2024 रोजी मी व माझे कुटुंबियांचे नावाने समाज कल्याण विभाग पंचायत समीती चिखली अंतर्गत मिळत असलेले शेती अवजारे इलेक्ट्रीक पंप, स्प्रिंकलर पाईप व शिलाई मशीन असे साहीत्य मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जावरुन श्री. भंडारे यांनी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बुलढाणा यांना सादर केलेल्या प्रस्तावाचा मोबदला म्हणुन तसेच सदर योजनेचे अनुदान मिळवुन देण्यासाठी पंच क्र.1 यांचे समक्ष 11000/- रुपये लाचेची मागणी केली व त्यापैकी लाचेचा पहीला हप्ता 6000/- रुपये स्विकारण्यास संमती दर्शविली. त्यावरुन दिनांक 14.03.2024 रोजी आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री रविंद्र हिम्मतराव भंडारे, पद कनिष्ठ सहायक, समाज कल्याण विभाग, पंचायत समीती चिखली यांनी त्यांचे समाज कल्याण विभाग पंचायत समीती चिखली येथील कार्यालयात 15.29 ते 15.40 वा दरम्यान पंचासमक्ष लाच रक्कम स्विकारली. वरुन लोकसेवक श्री रविंद्र हिम्मतराव भंडारे, वय 54 वर्षे, पद कनिष्ठ सहायक, समाज कल्याण विभाग, पंचायत समीती चिखली यांचे विरुध्द मी कायदेशिर फिर्याद देत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sangram damodhar patil(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sangram damodhar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**